महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.DGP-D८०१९/८/२०२५-DESK ८ (सीई - ९४७) दि. ३०/०६/२०२६

वाचा :- शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील सन २०२५-२६ च्या निवडसूचीमध्ये समावेश असलेल्या खालील नमूद **प्रमुख लिपिक, गट क** यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन नियुक्तीच्या ठिकाणी त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून **कार्यालय अधीक्षक, गट ब** (वेतन श्रेणी एस-१४ रु.३८,६०० - १,२२,८००/-) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | नांव | सध्याचे नियुक्ती कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीचे कार्यालय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. भरत सभाजी गर्जे | पोलीस महासंचालक कार्यालय कार्यासन क्रमांक ३ | पोलीस महासंचालक कार्यालय कार्यासन क्रमांक ६अ | श्री. तरारे यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीने रिक्त पदावर |
| २. | श्री. दिनेश देवजी बसवणकर | पोलीस महासंचालक कार्यालय कार्यासन क्रमांक २१ | पोलीस महासंचालक कार्यालय कार्यासन क्रमांक ३८ | श्रीमती वाघ यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त पदावर |
| ३. | श्री. राजेंद्र बाळकृष्ण काडगे | पोलीस महासंचालक कार्यालय कार्यासन क्रमांक २२ | अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई | श्री. साखरे यांच्या पदोन्नतीने रिक्त पदावर |

*उपरोक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय/आदेश यांच्या अधिन राहून देण्यात येत आहे. उपरोक्त पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधितांना नियमाधीनतेचा (regularization) व सेवाज्येष्ठतेचा (seniority) कोणताही हक्क असणार नाही.

२. उपरोक्त प्रमाणे पदोन्नती झालेल्या प्रमुख लिपिकांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणाची यादी संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता द्यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३. उपरोक्त नमूद पदोन्नत अधिकारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पीएवाय.१०८२/सीआर-११०० (दोन)/एसईआर-३, दि.०६/११/१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील त्यांची वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम १९८१ मधील ११ (१) (अ) नुसार केली जाईल, यांची त्यांनी नोंद घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या प्रमुख लिपिकांचे अभिनंदन!!

सदानंद दाते
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

श्री. भरत सभाजी गर्जे, प्रमुख लिपिक, कार्यासन क्रमांक ३
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३)

श्री. दिनेश देवजी बसवणकर, प्रमुख लिपिक, कार्यासन क्रमांक २१
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २१)
श्री. राजेंद्र बाळकृष्ण काडगे, प्रमुख लिपिक, कार्यासन क्रमांक २२
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २२)

प्रत सस्नेह अग्रेषित :-
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित :-
अपर पोलीस महासंचालक, आस्थापना/का.व सु./प्रशासन/राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना/का.व सु./प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक, का. व सु., म.राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/उपसहायक
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३/२१/२२

२. पदोन्नत झालेल्या उपरोक्त प्रमुख लिपिक यांना त्यांनी आदेशामधील परिच्छेद क्र.२ च्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता केल्यानंतर संबंधीत कार्यालय प्रमुखांनी/पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास (का.क्र.८ ला लक्षवेध करुन) सादर करावा.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in संकेतस्थळावर (शहर लिपिक संवर्ग कार्यालय अधीक्षक पदोन्नती) या शिर्षाखाली १ महिन्यांसाठी प्रसिध्द करण्यात यावेत.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ६/६अ/१०/३२/३६/३८
कार्यासन क्रमांक - ८ चे वेतन व रजा लिपिक

(अभिषेक त्रिमुखे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.